# गहू संशोधन विभाग
# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

जा.क्र.व.सं.शा./गहू / ३५० /२०२५ दि. ०५ / १२ /२०२५

## निविदा सूचना

**विषयः- सन २०२५-२६ मध्ये गहू संशोधन विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत प्रक्षेत्रावर CCTV camera सर्व साहित्यासह लावणेकरिता दर (कोटेशन) बोलविण्यासाठी व्यापक प्रसिद्धी करणेबाबत.....**

वरील विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते कि, गहू संशोधन विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत प्रक्षेत्रावर CCTV camera सर्व साहित्यासह लावणेकरिता निविदा दर खालील प्रमाणे अटी व शर्तीस अधीन राहून मागविण्यात येत असून निविदा मसुदा/निविदेचे स्वरूप सोबत जोडण्यात आलेले आहे.

**अटी व शर्ती**

१. निविदा पत्रक/कोटेशन कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० ते दुपारी ५.३० या वेळेत स्वीकारल्या जातील.

२. निविदा मसुदा मध्ये नमूद specification नुसारच CCTV camera व त्या निगडीत साहित्याचे दर नमूद करावे. अन्यथा निविदा रद्द करण्यात येईल.

३. निविदेमध्ये जोडणीचा खर्च (installation charges ) सुद्धा नमूद करावा.

४. CCTV camera व इतर साहित्याची जोडणी करतांना विद्यापीठाचे काही नुकसान झाल्यास विद्यापीठ प्रशासनाने ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे नुकसान भरपाई संबंधित निविदाधारक/कंत्राटदाराकडून वसूल करण्यात येईल.

५. CCTV camera व इतर साहित्याची जोडणी करतांना कुठलीही दुर्घटना/अपघात/जीवितहानी झाल्यास हे कार्यालय किंवा कोणताही कर्मचारी/अधिकारी किंवा विद्यापीठ जवाबदार राहणार नाही. याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित निविदाधारक/कंत्राटदाराची राहील.

६. विभागावर देण्यात आलेले काम पूर्ण करण्यात यावे, कामाबाबत विभागावरून तक्रार आल्यास किंवा काम अर्धवट राहील्यास सदर कामाचे देयक काढण्यात येणार नाही.

७. विद्यापीठ प्रशासनाने वेळोवेळी निर्देशित केलेल्या नियमांचे पालन करणे संबंधित निविदाधारकांना बंधनकारक राहील.

८. निविदाधारक/कंत्राटदारांनी देयक सादर करतेवेळी बँक खाते बाबतची संपूर्ण माहिती सादर करावी, अन्यथा देयक अदा केले जाणार नाही.

९. या कार्यालयातर्फे निविदाधारकास प्रक्षेत्रावर CCTV camera व इतर साहित्याची जोडणी करतांना मनुष्यबळ पुरविण्यात येणार नाही.

१०. निविदाधारक/कंत्राटदारास CCTV camera व इतर साहित्य पुरवठा व त्याची जोडणीच्या कामाचे देयक काम पूर्ण व विहित वेळेत पूर्ण केल्यावर व काम समाधानकारक झाल्याचे प्रमाणित केल्यानंतरच कामाचे देयक पारित करण्यात येईल.

११. उपरोक्त करीत असतांना कोणताही वाद विवाद निर्माण झाल्यास सदर वाद विवाद विद्यापीठ विधी विभागाचे अधिकारी/ मा. संशोधन संचालक, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचे समक्ष मिटविला जाईल व अंतिम निर्णय वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ, गहू संशोधन विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचा राहील आणि तो सर्वांना मान्य करणे बंधनकारक राहील.

१२. निविदेतील दर एक वर्षा करिता वैध राहतील.

१३. वरीलप्रमाणे अटी व शर्तीस अधीन राहून सोबत जोडलेल्या निविदा मसुदा तपशिला नुसार दि. १६.१२.२०२५ रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत निविदा सीलबंद लीफाफामध्ये सादर करावी.

वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ
गहू संशोधन विभाग
डॉ. पं. दे.कृ.वि., अकोला

## निविदा (कोटेशन) मसुदा

सन २०२५-२६ मध्ये गहू संशोधन विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत प्रक्षेत्रावर CCTV camera सर्व साहित्यासह लावणेकरिता दर खालील प्रमाणे आहेत.

| कामाचा तपशील | दर (रु.) | शेरा |
|---|---|---|
| Security display camera setup Laying of fibre optic cable around 1000 mtr, with fixing of 5 no of 6/8 MP IP high definition sheded camera with required setup (2/4TB) and fixing works.. | | |

निविदा सुचनेमधील संपूर्ण अटी व शर्ती मला सर्वस्वी मान्य आहेत.

**ठिकाण:**

**दिनांक:**

**स्वाक्षरी**

नाव व संपूर्ण